<u>सं. फौ. ख. क्र.४००/२०१६</u> निशाणी ३०

**<u>सरकार तर्फे साक्षीदार क्र.२ यांचा शपथेवर जबाब</u>**
**<u>मी सत्यप्रतिज्ञेवर कथन करते/करतो की,</u>**

नाव – दादाराव रघुनाथ लिखार

वय – ५७ वर्षे, व्यवसाय – एएसआय, अकोट ग्रामीण पो.स्टे.

पत्ता – रा. अकोट, ता. अकोट, जि. अकोला.

**<u>सरकारतर्फे सरकारी वकिल श्रीमती फौजिया तबस्सुम अब्दुल सादिक यांचे मार्फत सरतपास सुरुः</u>**

१. मी उरळ पो.स्टे. येथे सन २०१४ ते २०२० या कालावधीमध्ये सहा. पोलीस उपनिरीक्षक व हवालदार म्हणून कार्यरत होतो. दि.२७.०५.२०१६ रोजी मी पो.स्टे. टाऊन बिट येथे पेट्रोलिंग करीत असताना सायं. ६.०० वा. सुमारास आमच्या गुप्त बातमीदाराकडून माहिती मिळाली की, ग्राम गायगाव येथील जावेद खान गुलखान पठाण हा त्याच्या घरामध्ये विना परवाना अवैधरित्या रॉकेट साठा करुन ठेवलेला आहे. सदर माहितीच्या अनुषंगाने ग्राम गायगाव येथे मी, पो.कॉ. प्रविण मोरे जावून दोन पंचांना बोलावून आम्हाला मिळालेल्या बातमीची माहिती त्यांना दिली. त्यानंतर, मी, प्रविण मोरे व दोन पंच असे मिळून गायगाव येथील आरोपीच्या राहत्या घरासमोर गेलो. तेथे घराच्या पश्चिम दिशेस एक इसम हजर होता. त्यास त्याचे नाव गाव विचारले असता त्याने त्याचे नाव जावेद खान गुलखान पठाण असे सांगितले. त्यास आम्ही तेथे येण्याचे कारण सांगितले व त्याच्या घराची दोन पंचासमक्ष झडती घेतली असता त्याच्या घराच्या आतमध्ये पश्चिम दिशेला असलेल्या पश्चिम दिशेकडील भिंतीला तीन ३५ लि. क्षमतेच्या प्लॅस्टीक कॅन दिसून आल्या. त्याची आम्ही उघडुन पाहणी केली असता त्यामध्ये निळसर रंगाचा रॉकेल सारखा दिसणारा द्रव्य मिळून आला. त्यामध्ये एकुण ८५ लि. इतका द्रव्य साठा मिळून आला. सदर द्रव्य साठ्याचा वास रॉकेल सारखा मिळून आला. सदर तीन कॅन व बाजूला पडलेल्या दोन चाळी ह्या दोन पंचासमक्ष ताब्यात घेवून त्याचा पंचनामा केला. जप्त केलेल्या प्रत्येकी कॅनमधून ७५०मिली तीन काचेच्या वेगवेगळ्या बाटलीमध्ये नमुना तपासणीकरीता काढून घेतल्या व त्या बंद करुन लाखेच्या सिलाच्या सहाय्याने सिल केले व त्यावर पंचांच्या व माझ्या सह्यांचे

कागदी लेबल चिकटविले. आता मला सदर जप्ती पंचनामा दाखविण्यात आला त्यावर पंचांची, माझी व पंचांची सह्या आहेत त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.३१** देण्यात येत आहे.

२. सदर घटनास्थळाचा पंचनामा दोन पंचांचसमक्ष तयार केला. आता मला सदर घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला त्यावर माझी, आरोपी व दोन पंचांच्या सह्या असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.३२** देण्यात येत आहे. सदर मुद्देमाल ताब्यात घेवून आरोपीसह पो.स्टे. ला आलो. आरोपी याने जिवनावश्यक वस्तू कायदा कलम ३ व ७ प्रमाणे गुन्हा केल्याने त्याच्या विरुध्द मी फिर्याद दिली. आता मला सदर फिर्याद दाखविण्यात आली त्यावर माझी सही असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.३३** देण्यात येत आहे. आता मला छापील फिर्यादी दाखविण्यात आली त्यावर माझी सही असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.३४** देण्यात येत आहे. आरोपीस मी पाहिल्यास ओळखू शकतो. आरोपी आज न्यायालयात गैरहजर. आरोपीच्या ओळखीबाबत कोणताही वाद उपस्थित नाही.

सरतपास पूर्ण.

**<u>आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. बी. पी. उपर्वट यांचे मार्फत उलटतपासः</u>**

३. दि.२७.०५.२०१६ रोजी मी पो.स्टे. उरळ येथे उरळ टाऊन बिटचे कामकाजकामी कर्तव्यावर होतो. हे म्हणणे खरे आहे की, ज्या ज्या वेळी मी पेट्रोलिंगला जातो, त्यावेळी वरीष्ठांची परवानगी घ्यावी लागते. दि.२७.०५.२०१६ रोजी मी माझ्या वरीष्ठांची परवानगी तोंडी घेतली होती. लेखी परवानगी घेतली नाही कारण मला ती आवश्यक वाटली नाही. हे म्हणणे खरे आहे की, एखादा व्यक्ती पो.स्टे. ला तक्रार घेवून आल्यास त्या तक्रारीवर वरीष्ठ अधिकारी यांचा शेरा घेतला जातो. आता मला नि.क्र.३३ कडील लेखी फिर्याद दाखविण्यात आली त्यावर माझ्या वरीष्ठांचा शेरा दिसून येत नाही. मी पोलीस हवालदार असल्याकारणाने मला पो.स्टे. कडून शिक्का देण्यात आलेला आहे. नि.क्र.३३ कडील माझ्या नावाचा मी शिक्का मारलेला नाही.

४. हे म्हणणे खरे आहे की, गायगाव या गावाची लोकसंख्या अंदाजे तीन ते साडे तीन हजार एवढी आहे. हे म्हणणे खरे आहे की, गायगाव या गावी सरपंच, कोतवाल व

पोलीस पाटील आहे. मी छापा टाकण्याकामी गायगाव येथे गेलो त्यावेळी तेथील सरपंच, कोतवाल व पोलीस पाटील यांना तशी माहिती दिली नव्हती. ज्या घरी छापा टाकला त्या घराच्या मालकीबाबत कोणतेही कागदपत्र प्राप्त केली नाहीत. मी छापा टाकण्याकामी गेलो होतो त्यावेळी द्रव्यामधील तज्ञ व्यक्तीला सोबत घेवून गेलो नव्हतो तसेच माझ्यासोबत मोजमाप करण्यासाठी कोणतेही साहित्य घेवून गेलो नव्हतो. पंचांना पाचारण करण्यापुर्वी मी कोणेतेही लिखीत नोटीस त्यांना पंचनामा करण्यासाठी दिली नव्हती.

५. गायगाव येथून उरळ पो.स्टे. येथे येण्याकरीता वाहनाने २० मि. अवधी लागतो. आता मला माझी फिर्याद दाखविण्यात आली त्यामध्ये एक तासाचे विलंबाचे कारण नमुद केलेले नाही. आता मला नि.क्र.३४ कडील छापील फिर्याद दाखविण्यात आली त्या सहीच्या खाली नाव नमुद केलेले नाही. मी स्वतःहुन सांगतो की, सदरची सही माझी आहे. आता मला नि.क्र.३१ कडील जप्ती पंचनामा दाखविण्यात आला, त्यामधील स्तंभ क्र.१३ मधील असलेली सही ही आरोपीची सही नाही, हे म्हणणे खरे नाही. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासादरम्यान कथन केलेल्या सर्व बाबी खोट्या सांगितलेल्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात सांगितल्या प्रमाणे जप्त केलेला मुद्देमाल हा बेवारस जप्त केलेला आहे व तो आरोपीचा असल्याचा दाखविला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपी विरुध्द खोटी फिर्यादी दाखल केलेली आहे व आज खोटा पुरावा देत आहे.

उलटतपास पुर्ण.
फेरतपास नाही.

**दिनांकः– १६.०९.२०२५**

**श्रवणोत्तर निवेदन स्विकृत**

DAYANAND MARUTI WAGHMARE
Digitally signed by DAYANAND MARUTI WAGHMARE
Date: 2025.09.17 11:01:09 +0530

**(डी. एम. वाघमारे)**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,**
**(न्यायालय क्र.२), बाळापूर.**

<u>प्रमाणपत्र</u>

मी अधिकथन करतो की, पी.डी.एफ. करुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णय/आदेश/ पुरावा मधील शब्द नि शब्द हे मुळ न्यायनिर्णय/पुरावा/आदेशाप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| न्यायालयाचे नाव | :– | **श्री. डी. एम. वाघमारे,**<br>सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, व प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, बाळापूर. |
| लघुलेखकाचे नाव | :– | अजय एन. हांडे |
| घोषित दिनांक | :– | १६/०९/२०२५ |
| न्यायनिर्णय/ आदेश/ पुराव्यावर पिठासीन अधिकारी यांनी केलेल्या स्वाक्षरीचा दिनांक | :– | १६/०९/२०२५ |
| अपलोड केल्याचा दिनांक | :– | १७/०९/२०२५ |